# उद्यान पंडित पुरस्कार - २०१०



## डॉ.संदेश मारुती पाटील

मु.पो.हाशिवरे,
ता. अलिबाग, जि. रायगड

- ६.२० हेक्टर जमीन असून त्यात आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत आंबा पिकाची लागवड. त्यात पपई, दुधी भोपळा, कारले, तोंडली, घोसाळी, शेवगा इ. पिकांची लागवड.
- गर्डलिंग तंत्रज्ञान विकसीत केले त्यामुळे आंब्याचे पिक लवकर म्हणजे मकरसंक्रातीच्या सुमारास बाजारात आणणे त्यांना शक्य झाले.
- आजूबाजूच्या तरुणांना आंबा लागवडीमध्ये आंतरपिक घेणेबाबत प्रवृत्त केले आहे.
- फलोत्पादन पिकांकरीता स्वयंचलीत ठिबक संचाचा वापर.

# उद्यान पंडित पुरस्कार - २०१०



## श्री. आनंद जयंत देसाई
मु.पो पावस
ता. रत्नागिरी जि. रत्नागिरी

- कातळ जमिनीवर आंबा लागवड करुन त्यात ठिबक सिंचनाव्दारे पाण्याचा वापर.
- हापूस,केशर, रायवळ, रत्ना इ. अनेक आंब्याचे वाणाची लागवड .
- ग्लोबल गॅप प्रमाणपत्र घेतले असून यशस्वीपणे आंब्याची निर्यात.
- आंबा स्थानिक बाजारपेठेत विक्रीबरोबरच त्याच्या मुल्यवर्धनासाठी आंबा प्रक्रियेबाबतही उल्लेखनीय काम.

# उद्यान पंडित पुरस्कार - २०१०



**श्री. अवधुत गरबड महाजन**
मु.पो चुंचाळे
ता. चोपडा जि. जळगांव

- आंबा, पेरु, चिक्कू, आवळा, रामफळ, कांदा, वांगी, काकडी, कलींगड, ढोबळी मिरची, शेवगा इ. पिकांची लागवड.
- शेतीमाल उत्पादनाबरोबर उत्कृष्ट प्रकारे पॅकींग करुन स्वतःच्या वाहनाने ग्राहकापर्यंत विक्री.
- सामुहिक शेततलाव करुन फळझाडांना ठिबक व तुषार सिंचनाव्दारे पाण्याची व्यवस्था.
- प्लॅस्टीक मल्चिंगचा वापर करुन इतर शेतकऱ्यांनाही त्याबाबत प्रोत्साहीत करतात.
- पेरु बागेत त्यांनी मिडो ऑर्चर्ड तंत्राचा वापर.

# उद्यान पंडित पुरस्कार - २०१०



**श्री. संजय निंबा भामरे**
मु. काळगांव, पो. धमनार,
ता. साक्री, जि. धुळे

- द्राक्ष व डाळींबाचे उत्पादन व दिल्ली, अहमदाबाद, बडोदा, सुरत येथे विक्री,
- निर्यातक्षम डाळींबाचे उत्पादन घेण्यात यशस्वी .
- ४३ एकर क्षेत्रात शेणखत, कंपोस्ट खत, हिरवळीचे खत, आंतर मशागत यांत्रिक पध्दतीचा वापर या बाबींसह यशस्वीपणे डाळींब लागवड.
- अधिक उत्पादन मिळण्यासाठी ते ठिबक सिंचन पध्दतीने विद्राव्य खतांचा वापर.
- डाळींब लागवड या विषयावर ते इतर शेतकऱ्यांना चर्चासत्राव्दारे मार्गदर्शन करतात

# उद्यान पंडित पुरस्कार - २०१०



**श्री. संतोष पांडुरंग कोंडे**
मु. पो. केळवडे
ता. भोर, जि. पुणे

- जमिनीचे सपाटीकरण करुन केळी, शेवगा, चिक्कू, टोमॅटो या पिकांची लागवड.
- शेवग्याच्या शेंगास असलेली मागणी व मिळणारा किफायतशीर भाव याचा विचार करुन शेवग्याची लागवड.
- शेतातील बांधावर फणस, आवळा इ. फळपिकांची लागवड.
- शेतमालाचे ग्रेडींग, पॅकींग करण्यासाठी शेतामध्ये पॅकहाऊसची उभारणी केली आहे.
- शेतामध्ये शेणखतापासून गांडूळ खत उत्पादन युनिट.

# उद्यान पंडित पुरस्कार - २०१०



**श्री. विश्वनाथ**
**(राजाराम दादू महाजन)**
मु. पो. वाळवा, ता. वाळवा, जि. सांगली.

- श्री. महाजन गेली ३० वर्षे स्वतःच्या द्राक्ष शेतीत सेंद्रिय शेतीचे प्रयोग करीत आहेत.
- वसंतराव आर्वे यांचे तासगांव चमन या ग्रुपमार्फत द्राक्षाची निर्यात सुरु केली.
- २००७ पासून आजअखेर प्रतिवर्षी ते १२ ते १४ टन एकरी उत्पादन.
- सिंचनासाठी पाण्याचा पी.एच.८.९ च्या पुढे आहे.हे पाणी द्राक्ष बागेस वापरण्यास योग्य नाही तरी सुध्दा त्या प्रतिकूल परिस्थितीत सेंद्रिय पध्दतीने नियोजन करुन अडचणींवर मात.



# उद्यान पंडित पुरस्कार - २०१०

**श्री. संदीप अरुण नरके**
मु. पो. बोरगांव
ता. पन्हाळा,जि.कोल्हापूर

- आंबा, केळी, चिक्कू व औषधी वनस्पती इ. पिकांची लागवड केली आहे.
- इस्त्राईल देशास भेट देऊन तेथील आधुनिक शेतीची माहिती घेऊन ते तंत्रज्ञान स्वतःच्या शेतामध्ये राबवितात.
- गांडूळ खत, जैविक खते, मल्चिंग तंत्र , माती परिक्षणानुसार विद्राव्य खतांचा वापर,सूक्ष्म सिंचन तंत्राने पाण्याचे व्यवस्थापन इ. बाबींचा अवलंब करतात.
- प्लॉस्टीक आच्छादित शेततळे व विहीरीवर स्वयंचलीत ठिबक सिंचन यंत्रणा (ऑटोमेशन) बसवली आहे.
- फळे व भाजीपाला विक्रीस तयार करण्यासाठी पॅकहाऊसची उभारणी.

# उद्यान पंडित पुरस्कार - २०१०



**श्री. चंद्रकांत शिवाजीराव क्षिरसागर**

मु. कडवंची पो.नाव्हा, ता. जालना,जि. जालना

- सूक्ष्म सिंचनव्दारे योग्य पध्दतीने पाणी व्यवस्थापन करुन कमीत कमी पाण्यात सुध्दा बागा जगवता येतात व उत्पादन सुध्दा देऊ शकतात हे त्यांनी सिध्द करुन इतर शेतकऱ्यामध्येही आत्मविश्र्वास निर्माण केला.
- कडवंची परिसरात सोनाका द्राक्ष व भगवा डाळींब या पिकांची योग्य व्यवस्थापनाच्या जोरावर यशस्वी लागवडीस त्यांनी सुरुवात केली.
- एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचा अवलंब.
- संपूर्ण फळबागेस ठिबक सिंचनाव्दारे पाणी व्यवस्थापन.डाळींब पिकात डिफयुजरचा वापर करुन कमी पाण्यात झाडे जगविली आहेत.

# उद्यान पंडित पुरस्कार - २०१०



## श्री. शिवाजी नरसींगराव पाटील

मु.पो. मलकापूर, ता. उदगीर,जि. लातूर

- जमीन व पाण्याची उपलब्धता विचारात घेऊन आंबा, जांभूळ व चिंच या पिकांची लागवड.
- ठिबक सिंचन तंत्राचा अवलंब केला.
- फळबागेस फर्टीगेशन, सेंद्रिय खताची निर्मिती व वापर या बाबींचा अवलंब.
- लाल कंधारी गाईंचे संगोपन केले आहे व त्यांच्यासाठी सुधारीत चारा पिकाची लागवड.
- त्यांनी मुक्त गोठा संकल्पनेचा इस्त्राईलमध्ये अभ्यास केला असून त्याचा अवलंब.

# उद्यान पंडित पुरस्कार - २०१०



## श्री. जयवंत पांडुरंगजी सांगुनवेढे

मु.पो. खंडाळा, ता. तेल्हारा जि. अकोला

- संत्रा व केळी लागवड, ठिबक तंत्राने पाणी व्यवस्थापन.
- ऊतीसंवर्धित तंत्राने उत्पादित केळी रोपे वापरुन अधिक उत्पादन.
- पिकांच्या काढणी पश्चात सुयोग्य हाताळणीवर विशेष भर.
- कांदा चाळीची उभारणी केली आहे.
- शेतकऱ्यांना ठिबक सिंचन, खतांचा वापर ,सेंद्रिय शेती पध्दती, कीड व रोग नियंत्रण, काढणी, प्रतवारी व पॅकींग याबाबत सातत्याने मार्गदर्शन.

# उद्यान पंडित पुरस्कार - २०१०



**श्री. कुंदन आनंदराव कळंबे**
मु.पो. वरखेड,
ता. तिवसा जि. अमरावती

- त्यांचेकडे १३५० संत्रा झाडे असुन त्यापैकी २६० झाडांपासून सेंद्रिय पध्दतीने तर १०९० झाडांपासून हायटेक पध्दतीने उत्पादन घेतले जाते.
- उन्हाळयात भासणारी पाण्याची अडचण दूर करण्यासाठी शेततळे.
- पाणी व्यवस्थापन करण्यासाठी ठिबक व तुषार सिंचनचा वापर.
- फळे व भाजीपाला उत्पादक संस्था अमरावती या संस्थेची स्थापना.
- संत्र्याची उत्पादक ते ग्राहक अशा पध्दतीने विक्री होण्याकरीता तिवसा गोल्ड या ब्रँडनेमने विक्री



# उद्यान पंडित पुरस्कार - २०१०

## श्री. राधेश्याम सूरजमल अग्रवाल

मु.वरुड, पो.सेवाग्राम, ता.वर्धा जि. वर्धा

- त्यांचे व कुटुंबियांचे १२.६७ हेक्टर क्षेत्रात संत्रा, मोसंबी या फळ पिकांची व गुलाब, लिली, ग्लॅडिओलस, मोगरा,निशीगंध, झेंडू इ. फुलपिकांची लागवड
- शेवगा, वाल, तोंडली, फुलपिके यासाठी ठिबक तंत्राने कमी पाण्यात यशस्वी लागवड.
- कोकोपीट व रुट ट्रेनरचा वापर करुन झेंडूची दर्जेदार रोपे तयार करतात.
- माती व पाणी परिक्षण वर आधारीत फर्टीगेशन पध्दतीने खतांचा वापर.
- श्री. अग्रवाल हे आचार्य विनोबा भावे यांच्या विचारप्रणालीशी अनुरुप व परिसरात नाविन्यपूर्ण पध्दतीने शेती करणारे शेतकरी आहेत.